पुणे पोलीस

**जनसंपर्क अधिकारी कार्यालय,पुणे शहर**
P.R.O. Office, Crime Branch, Pune City Ph.020 / 26122478
Adress - POLICE COMMISSIONER OFFICE,Pune City.
NEAR G.P.O.SADHU VASWANI ROAD, PUNE MAHARASHTRA - 411001
E-Mail ID : crimepress.pune@gov.in

**प्रेसनोट क्र. १५ दि. ०३/०१/२०२०**

**बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर**

**अवैधरित्या पिस्तुल बाळगणा-या इसमाची माहिती बंडगार्डन पोलीसांना मिळाल्याने त्यास ताडीवाला रोड भागातून सापळा रचून ताब्यात घेतले.**

बंडगार्डन पोलीस स्टेशनच्या हद्दीत अवैधरित्या पिस्तुल बाळगणा-या इसमाची माहिती बंडगार्डन पोलीसांना मिळाल्याने त्यास ताडीवाला रोड भागातून सापळा रचून ताब्यात घेतले असता त्याचेकडे एक पिस्तुल व १० जीवंत काडतुस मिळून आल्याने त्यास बंडगार्डन पोलीसांनी अटक केली आहे.

त्याबाबत सविस्तर माहिती अशी की, दि. ०२/०१/२०२० रोजी बंडगार्डन पोलीस ठाण्याकडील तपास पथकातील कर्मचारी कैलास डुकरे व किरण तळेकर यांना त्यांचे बातमीदारामार्फत बातमी मिळाली की, ताडीवाला रोड भागातील मॅक्स नावाचा इसम हा अवैधपणे पिस्तुल बाळगुन ताडीवाला रोड भागात वावरत आहे. त्याच्या हातुन कोणतातरी गंभीर गुन्हा घडण्याची शक्यता आहे. अशी बातमी मिळाल्याने कैलास डुकरे व किरण तळेकर यांनी सदरची बातमी पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.दिगंबर शिंदे व तपास पथकाचे अधिकारी सपोनि संदिप जमदाडे यांना सांगितली. सदरची बातमी संदिप जमदाडे, सहा.पोलीस निरीक्षक यांनी बंडगार्डन पालीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री.श्रीकांत शिंदे यांना सांगितली असता त्यांनी अधिकारी व कर्मचा-यांना सापळा रचुन मॅक्स याला ताब्यात घेण्याबाबतच्या सुचना दिल्या.

वरीष्ठांकडून मिळालेल्या सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक गुन्हे श्री.दिगंबर शिंदे व सपोनि संदिप जमदाडे यांनी तपास पथकाचे पोहवा संतोष पागार, कैलास डुकरे, पोशि निखील जाधव व किरण तळेकर यांचेसह ताडीवाला रोड भागात सापळा रचून मॅक्स यास ताब्यात घेतले त्यावेळी त्याने त्याचे नाव मुकेश ऊर्फ मॅक्स शिवाजी भंडारी वय २८ वर्षे, रा. इन आम मशिद जवळ, सिध्दार्थ नगर, प्रायव्हेट रोड, १३ ताडीवाला रोड, पुणे असे सांगितले. त्याच्याकडे एक पिस्तुल व १० जीवंत काडतुस मिळून आले. त्याच्या विरुद्ध बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर येथे गुन्हा दाखल करुन त्याचा पुढील तपास संदिप जमदाडे, सहा. पोलीस निरीक्षक, बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर हे करीत आहेत. चौकशीमध्ये ताब्यात घेतलेल्या आरोपीने लोणीकंद पोलीस स्टेशनच्या हद्दीत बंदोबस्तसाठी कर्तव्यावर असणा-या औरंगाबाद येथील सहा.पोलीस निरीक्षकाची पिस्तुल व १० जिवंत काडतुस दि.०१/०१/२०२० रोजी चोरी केलेचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई परिमंडळ २ चे पोलीस उप-आयुक्त शिरीष सरदेशपांडे, लष्कर विभागाचे सहा. पोलीस आयुक्त रविंद्र रसाळ यांचे मार्गदर्शनाखाली बंडगार्डन पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्रीकांत शिंदे, यांचे सुचनांप्रमाणे पोलीस निरीक्षक गुन्हे दिगंबर शिंदे, तपास पथकाचे सपोनि संदिप जमदाडे, संतोष पागार, कैलास डुकरे, पोशि निखील जाधव व किरण तळेकर यांच्या पथकाने केली आहे.

(श्रीकांत शिंदे)
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
बंडगार्डन पोलीस स्टेशन, पुणे शहर